# 7 कोटी मुलांसाठी गुड न्युज

## शाळेतच होणार आधार बायोमेट्रिक अपडेट



**महासागर प्रतिनिधी**
**अमरावती,( दि.26 )-** देशातील सुमारे 7 कोटी मुलांनी वयाची पाच वर्षे पूर्ण केल्यानंतरही आधार कार्डमध्ये आवश्यक बायोमेट्रिक अपडेट केलेले नाही. त्यामुळे त्यांना शाळा प्रवेश, शिष्यवृत्ती आणि इतर सरकारी योजनांच्या लाभामध्ये अडथळे येत होते. या समस्येवर उपाय म्हणून युनिक आयडेंटिफिकेशन ऑथॉरिटी ऑफ इंडिया ने मोठा निर्णय घेतला आहे.

युआयडीएआय आता देशभरातील शाळांमधूनच मुलांचे बायोमेट्रिक अपडेट करण्याची सोय उपलब्ध करून देणार आहे. या प्रक्रियेसाठी एक विशेष तंत्रज्ञान विकसित केले जात असून, त्याची चाचणी अंतिम टप्प्यात आहे. पालकांच्या संमतीनुसार शाळेच्या परिसरातच मुलांचे बायोमेट्रिक अपडेट केले जाईल. युआयडीएआय चे सीईओ भुवनेश कुमार यांनी सांगितले की, पुढील 45 ते 60 दिवसांत हा उपक्रम टप्प्याटप्प्याने सुरू होईल.नियमांनुसार 5 ते 7 वर्षे वयोगटातील मुलांचे बायोमेट्रिक अपडेट मोफत केले जाते. मात्र 7 वर्षांनंतर हे अपडेट करण्यासाठी 100 रुपये शुल्क आकारले जाईल.

वेळेत अपडेट न केल्यास आधार क्रमांक डिॲक्टिव्हेट होण्याची शक्यता असते.या प्रकल्पात युआयडीएआय प्रत्येक जिल्ह्यात बायोमेट्रिक मशीन पाठवणार असून, ती रोटेशन तत्त्वावर विविध शाळांमध्ये नेली जातील. त्यामुळे अधिकाधिक मुलांना ही सुविधा सहज उपलब्ध होईल. बायोमेट्रिक अपडेट झाल्यानंतर मुलांना शाळा प्रवेश, परीक्षा नोंदणी, शिष्यवृत्ती तसेच सरकारी योजनांचा लाभ घेण्यात कोणताही अडथळा येणार नाही. याशिवाय युआयडीएआय या सुविधेचा विस्तार 15 वर्षे वय पूर्ण झाल्यानंतरच्या दुसऱ्या अनिवार्य अपडेटपर्यंत करण्याचा विचार करीत आहे. या निर्णयामुळे कोट्यवधी मुलांचे आधार अपडेट सहज होऊन त्यांना सर्व सरकारी लाभ वेळेत मिळण्याचा मार्ग मोकळा होणार आहे.

# श्री संत महादेव महाराज उर्फ निर्भय बाबा पुण्यतिथी महोत्सव



**महासागर प्रतिनिधी**
**मोर्शी, ( दि.26 ) -** सातपुड्याच्या पायथ्याशी वसलेल्या श्रीक्षेत्र सालबर्डी येथे लाखो भाविकांचे श्रद्धास्थान असलेल्या श्री संत महादेव महाराज उर्फ निर्भय बाबा यांचा 34 वा पुण्यतिथी उत्सव 27 जुलै ते 3 ऑगस्ट दरम्यान मोठ्या भक्तिभावाने साजरा होत आहे. महोत्सवाच्या पहिल्या दिवशी संतोषजी महाराज आढावणे (समर्पण आश्रम, भोकरदन, जालना) यांच्या हस्ते तीर्थस्थापना होऊन भागवत कथामालेची सुरुवात झाली. 27 जुलै ते 2 ऑगस्ट या कालावधीत ते दिव्य भागवत कथेचे मार्गदर्शन करतील. दररोज विविध महिला भजन मंडळांचे भजन कार्यक्रम रंगणार असून, 2 ऑगस्ट रोजी भागवत कथेचा समारोप होईल. 3 ऑगस्ट रोजी युवाचार्य संतोषजी महाराज आढावणे यांच्या काल्याच्या कीर्तनानंतर भव्य महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे. यासाठी 20 हजारांहून अधिक भाविक उपस्थित राहणार असून, भोजनासाठी वॉटरप्रूफ पंडालची व्यवस्था करण्यात आली आहे. तसेच 11 ऑगस्ट रोजी प्राक्षाळ पूजा व प्रसाद, तर 18 ऑगस्ट रोजी शारदा वारकरी महिला भजन मंडळ, खानापूर यांचा भजन कार्यक्रम होणार आहे.

### महादेव महाराजांचा परिचय

महादेव महाराजांचे मूळ गाव घाटलाडकी. बालपणापासूनच ते अवलिया व आध्यात्मिक वृत्तीचे होते. देऊरवाडा येथील संत मधु महाराजांच्या सहवासामुळे त्यांना ईश्वरभक्तीची गोडी लागली. 1964-65 मध्ये मोर्शी येथे आल्यानंतर हजारो भक्त त्यांच्या चरणी आकर्षित झाले. त्यांच्या आयुष्यातील एक चमत्कार आजही लोक सांगतात. आख्यायिका आहे की, हत्तीडोहाच्या प्रचंड प्रवाहात उडी घेतल्यावर त्यांचे निधन झाल्याची बातमी पसरली होती, परंतु काही वेळातच बाबा घंटीवाले मारुती महाराज मंदिराजवळ सुखरूप प्रकट झाले. आजही भाविकांच्या जीवनात चमत्कार घडवणारे बाबा हे श्रद्धा व भक्तीचे प्रतीक मानले जातात. पुण्यतिथी महोत्सव यावर्षीही मोठ्या उत्साहात पार पडत आहे.



# मोर्शी बाजार समितीतून शेतकऱ्यांच्या मालाची चोरी

## सीसीटीव्ही बंद, शेतकरी त्रस्त

**महासागर प्रतिनिधी**
**मोर्शी,( दि.26 )-** येथील कृषी उत्पन्न बाजार समितीच्या परिसरात शेतकऱ्यांच्या मालाची चोरी होत असून, सुरक्षेकरिता लावलेले सीसीटीव्ही कॅमेरे बंद अवस्थेत असल्यामुळे अज्ञात चोरट्यांचे फावले आहे. या घटनेमुळे शेतकऱ्यांमध्ये प्रचंड नाराजी पसरली आहे. बेलोरा (खंबीत) येथील शेतकरी पांडुरंग दगडूजी बोरवार आणि प्रियदर्शन मुकुंदराव पुंड यांनी दरवर्षीप्रमाणे यंदाही आपल्या शेतातील तुरीचे कट्टे विक्रीसाठी मोर्शी बाजार समितीत आणले होते. त्यांनी हनुमान मंदिराशेजारील शेडमध्ये कट्टे ठेवले. मात्र, त्या दिवशी काही कारणास्तव विक्री होऊ न शकल्याने तुरी शेडमध्येच ठेवावी लागली. दुसऱ्या दिवशी हर्रास निमित्त पुन्हा बाजार समितीत आले असता त्यांनी पाहिले की, त्यांच्या कट्ट्यांमधील अंदाजे 30 ते 35 किलो तूर चोरीला गेली आहे. ही बाब लक्षात येताच त्यांनी संबंधितांकडे तक्रार केली. निसर्गाच्या लहरीपणामुळे यंदा शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले असून, पेरलेल्या बियाण्याही उगवले नाहीत. अशा परिस्थितीत माल चोरीला गेल्यामुळे शेतकरी अधिकच अडचणीत सापडला आहे. शेतकऱ्यांच्या सुरक्षेसाठी लावलेले सीसीटीव्ही कॅमेरे बंद असून, त्यामुळे चोरट्यांचा ठावठिकाणा लागत नाही. त्यामुळे बाजार समिती प्रशासनाने त्वरित बंद असलेले सीसीटीव्ही सुरू करून चोरट्यांचा शोध घ्यावा आणि त्यांच्या विरोधात कठोर कारवाई करावी, अशी जोरदार मागणी शेतकरी वर्गाकडून होत आहे.

# ग्रामीण रुग्णालयात रुग्णांना फळ व बिस्कीट वाटप

## सामाजिक न्याय विभागाचे सलीम खान पठाण यांचा उपक्रम



**महासागर प्रतिनिधी**
**चांदूर रेल्वे,( दि.26 )-** चांदूर रेल्वे तालुक्यात सामाजिक कार्यात नेहमीच पुढाकार घेणारे आणि शासनाच्या योजना घरोघरी पोहचविण्यात अग्रेसर असलेले सामाजिक न्याय विभागाच्या बार्टीचे समतादूत सलीम खान खलील खान पठाण यांनी आपला वाढदिवस सामाजिक उपक्रम राबवून साजरा केला.

या निमित्ताने स्थानिक ग्रामीण रुग्णालयात दाखल रुग्णांना फळे आणि बिस्कीटचे वाटप करण्यात आले. रुग्णांच्या चेहऱ्यावर आनंदाची लहर पसरली. सलीम खान यांनी रुग्णालयातील सर्व रुग्णांना शुभेच्छा दिल्या व त्यांच्या लवकर बरे होण्याची प्रार्थना केली. कार्यक्रमावेळी ग्रामीण रुग्णालयाचे वैद्यकीय अधिकारी, चांदूर रेल्वे वकील संघाचे अध्यक्ष ॲड. राजीव अंबापूरे, पत्रकार प्रकाश रंगारी, शहजाद खान, विश्वजित घोडेस्वार यांसह अनेक मान्यवर उपस्थित होते.या सामाजिक उपक्रमामुळे वाढदिवस साजरा करण्याची एक वेगळीच पद्धत समाजासमोर आली. उपस्थित मान्यवरांनी सलीम खान यांच्या कार्याचे कौतुक केले आणि अशा उपक्रमातून समाजात सकारात्मक संदेश जात असल्याचे मत व्यक्त केले.

# तथाकथित अपंग संघटनेवर बंदीची मागणी

## महाराष्ट्र राज्य अपंग कर्मचारी संघटनेचे निवेदन

**महासागर प्रतिनिधी**
**अमरावती,( दि.26 )-** दि. 21 जुलै 2025 रोजी अंजनगाव सुर्जी नगरपरिषद कार्यालयात घडलेल्या धक्कादायक घटनेमुळे तालुका व जिल्ह्यात खळबळ उडाली आहे. नगरपरिषद आरोग्य विभागात लिपिक म्हणून कार्यरत असलेल्या अपंग महिला कर्मचारी प्रिया टांक यांच्यावर तथाकथित अपंग संघटनेच्या तीन महिला पदाधिकाऱ्यांनी कर्तव्यावर असताना मानसिक छळ केल्याची गंभीर घटना उघडकीस आली आहे.



या घटनेची गंभीर दखल घेत महाराष्ट्र राज्य अपंग कर्मचारी संघटना (शासन मान्यता प्राप्त) मुंबई-32, जिल्हा अमरावती यांच्या वतीने जिल्हाधिकाऱ्यांसह संबंधित प्रशासन विभागांना निवेदन देण्यात आले. संघटनेने स्पष्ट केले की अशा प्रकारच्या संघटना अपंग कर्मचाऱ्यांच्या हक्कांवर गदा आणतात. संघटनेने या तथाकथित संघटनेवर तत्काळ बंदी घालण्याची आणि दोषींवर कठोर कारवाई करण्याची मागणी केली आहे. या वेळी जिल्हाध्यक्ष राजेंद्र दिक्षित, जिल्हा सचिव किशोर मालोकार, कार्याध्यक्ष चंद्रकांत मामनकर, कोषाध्यक्ष युवराज थोरात, उपाध्यक्ष शालिनी बोरखडे, कपिल हडाले, भारत जामनेकर, परिक्षीत बारहाते, सचिन इंगोले, प्रसिद्धी प्रमुख राजू डांगे, नितीन गायकी, राजेंद्र धर्मासरे, महिला संघटक शुभांगी देशमुख, इंदिरा रेवस्कर, तसेच उर्दू जिल्हा प्रतिनिधी अफसर खान सर उपस्थित होते.

### धमकी व मानसिक छळाचा आरोप

कथित संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी प्रिया टांक यांचे अपंगत्व जबरदस्तीने तपासण्याचा प्रयत्न केला. त्यासोबतच उपसंचालक, आरोग्य विभाग अकोला येथे तपासणीस यावे किंवा वीस हजार रुपये द्यावे, अशी धमकी दिल्याचे तक्रारीत नमूद आहे. या प्रकारामुळे पीडित कर्मचाऱ्याला मानसिक त्रास सहन करावा लागला. घटनेची तक्रार अंजनगाव सुर्जी पोलीस ठाण्यात नोंदविण्यात आली असून चौकशी सुरू आहे.

# शस्त्रांची फोटो पोस्ट केल्याने तरुण अटकेत

**चांदूर बाजार** - इंस्टाग्रामवर शस्त्रासह फोटो पोस्ट केल्याच्या प्रकरणात शेफी नगर, शिरजगाव बंड येथील एका तरुणाला चांदूरबाजार पोलिसांनी अटक केली आहे. त्याच्याकडून एक लोखंडी सत्तूर व एक कट्यार जप्त करण्यात आली आहे. अटक करण्यात आलेल्या तरुणाचे नाव तंजील बेग शकील बेग (वय 23, रा. शेफी नगर, शिरजगाव बंड, चांदूरबाजार) असे आहे. तंजील बेग शकील बेगने आपल्या इंस्टाग्राम अकाउंटवर शस्त्रासह फोटो पोस्ट केल्याची माहिती चांदूरबाजार पोलिसांना मिळाल्यानंतर पोलिसांनी त्याला ताब्यात घेतले. त्याच्याकडून एक लोखंडी सत्तूर व एक कट्यार जप्त करण्यात आले. याप्रकरणी त्याच्याविरुद्ध भारतीय हत्यार कायदा कलम 4, 25 आणि महाराष्ट्र पोलीस अधिनियम कलम 135 अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# तालुका शालेय क्रीडा स्पर्धा, शारीरिक शिक्षकांची सहविचार सभा

## सेवानिवृत्त व पदोन्नती प्राप्त शिक्षकांचा सन्मान



**महासागर प्रतिनिधी**
**मोर्शी,( दि.26 )-** डुक्रीडा संचालनालय, महाराष्ट्र राज्य पुणे व जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय अमरावती यांच्या वतीने आयोजित तालुका शालेय क्रीडा स्पर्धा 2025 पूर्वी शारीरिक शिक्षकांची सहविचार सभा स्थानिक शिवाजी उच्च माध्यमिक शाळेत पार पडली.

या सभेच्या अध्यक्षस्थानी मुख्याध्यापक श्रीकांत देशमुख, तर प्रमुख अतिथी म्हणून मुख्याध्यापक मंचचे अध्यक्ष प्रवीण लांडे आणि जिल्हा शारीरिक शिक्षण विषय समितीचे सचिव डॉ. नितीन चव्हाळे उपस्थित होते. विविध शाळांचे प्रमुख आणि शारीरिक शिक्षक मोठ्या संख्येने सहभागी झाले. या कार्यक्रमात डॉ. नितीन चव्हाळे (शिवछत्रपती पुरस्कार प्राप्त) आणि सुखदेव खैरकर (साफल्य विद्यालय, सावरखेड) या सेवानिवृत्त शिक्षकांचा शाल, श्रीफळ व स्मृतिचिन्ह देऊन सन्मान करण्यात आला. तसेच नेताजी पाटील आणि धीरज वाईनदेशकर यांना मुख्याध्यापक पदावर पदोन्नती मिळाल्याबद्दल गौरविण्यात आले. सभेत तालुकास्तरीय क्रीडा स्पर्धांचे नियोजन व नियमावलीबाबत मार्गदर्शन करण्यात आले. नव्याने निवडण्यात आलेल्या कार्यकारिणीमध्ये अध्यक्ष म्हणून विजय तारापुरे, उपाध्यक्ष म्हणून नितीन जाणे, सचिव म्हणून चंद्रशेखर दुगाने, कोषाध्यक्ष म्हणून गजानन चौकट यांची निवड करण्यात आली. नवीन कार्यकारिणीकडून तालुक्यातील शारीरिक शिक्षणाला नवी दिशा मिळेल, असा विश्वास व्यक्त करण्यात आला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रेमा नवरे, तर आभारप्रदर्शन विजय तारापुरे यांनी केले.

# दमयंती नदीवरील पेठपुरा ते राममंदिर चौक पूल जीर्ण अवस्थेत

**महासागर प्रतिनिधी**
**मोर्शी, ( दि.26 ) -** मोर्शी नगरपरिषद हद्दीत असलेला पेठपुरा ते राममंदिर चौक दरम्यानचा दमयंती नदीवरील पूल केवळ 20 वर्षांतच धोकादायक स्थितीत आला आहे. यावर्षीच्या पहिल्याच पुराने पुलाला मोठे तडे गेले असून दोन तुकडे पडले आहेत. पुढील मोठ्या पुरामुळे हा पूल पूर्णतः कोसळण्याची भीती व्यक्त केली जात आहे.



या पुलावरून परिसरातील नागरिक बाजारहाट, शाळा व इतर कामांसाठी रोज प्रवास करतात. वारंवार दुरुस्तीची मागणी करूनही काहीच हालचाल न झाल्याने ही परिस्थिती उद्भवली असल्याचे नगरसेविका वैशाली कोकाटे यांनी सांगितले. मागील वर्षी मंजूर झालेल्या मच्छीसात व आठवडी बाजार पुलासोबत या पुलाचे बांधकाम करता आले असते, परंतु तसे झाले नाही, अशी खंत व्यक्त करण्यात आली. नागरिकांचे मत आहे की, पुलाचे तात्काळ ऑडिट करून, मोठा अपघात होण्यापूर्वी या मार्गावरील वाहतूक बंद करावी. तसेच, नवीन पुलाचे बांधकाम करण्यासाठी शासनाने त्वरीत निधी मंजूर करावा. मोर्शी शहर काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष भूषण कोकाटे यांनी सांगितले की, या पुलाच्या पुनर्बांधणीसाठी आमदार चंदु यावलकर यांच्यासोबत चर्चा करण्यात येणार आहे. स्थानिक नागरिकांनी प्रशासनाकडे तातडीने उपाययोजना करण्याची मागणी केली असून, उशीर झाल्यास मोठ्या दुर्घटनेची शक्यता नाकारता येत नाही.

# अतिवृष्टी नुकसानभरपाई शेतकऱ्यांच्या खात्यात जमा होण्यास सुरुवात

## विलास पाटील यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्याचे फलित

**महासागर प्रतिनिधी**
**वरूड,( दि.26 )-** मागील वर्षी ऑगस्ट-सप्टेंबर महिन्यात झालेल्या अतिवृष्टीमुळे तालुक्यातील संत्रा उत्पादक शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले होते. यामुळे शेतकरी आर्थिक संकटात सापडले होते. शासनाने नुकसानभरपाई जाहीर केली असली तरी प्रत्यक्षात ती रक्कम शेतकऱ्यांच्या खात्यात जमा न झाल्याने नाराजी व्यक्त होत होती.

या प्रश्नाची दखल घेत सामाजिक कार्यकर्ते विलास पाटील यांनी प्रशासन, तहसील कार्यालय, पंचायत समिती व जिल्हाधिकारी कार्यालयात वारंवार पाठपुरावा केला. सोशल मीडियाच्या माध्यमातून शेतकऱ्यांच्या व्यथा शासनापर्यंत पोहोचवल्या. अखेर त्यांच्या प्रयत्नांना यश आले असून नुकत्याच शेतकऱ्यांच्या खात्यात नुकसानभरपाईची रक्कम जमा होण्यास सुरुवात झाली आहे. शासनाच्या आपत्ती व्यवस्थापन



विभागाच्या निधीतून या भरपाईची अंमलबजावणी करण्यात येत आहे. प्रारंभी काही शेतकऱ्यांच्या खात्यावर पैसे जमा झाले होते. आता उर्वरित लाभार्थ्यांच्या खात्यातही रक्कम जमा होण्याची प्रक्रिया वेगाने सुरू आहे. महसूल विभाग आणि बँक यांच्यातील समन्वयामुळे ही प्रक्रिया सुलभ झाली आहे.

### शेतकऱ्यांचा आनंद आणि समाधान

भरपाईची रक्कम मिळाल्याने शेतकऱ्यांमध्ये आनंदाचे वातावरण आहे. शेतकरी नितीन पेलागडे म्हणाले, विलास पाटील यांनी आमच्या समस्यांकडे सातत्याने लक्ष दिले. त्यांच्या प्रयत्नांमुळे आज आमच्या खात्यावर पैसे जमा झाले. आम्ही त्यांचे आभार मानतो.

### पाठपुरावा महत्वाचा

ज्या शेतकऱ्यांच्या खात्यात अद्याप रक्कम जमा झालेली नाही, त्यांच्यासाठी महसूल प्रशासन विशेष मोहीम राबवत आहे. बँक खात्यांची पडताळणी करून अडकलेली रक्कम लवकर सोडवण्याचे प्रयत्न सुरू आहेत.शासनाच्या योजनांचा खरा लाभ सक्रिय लोकप्रतिनिधी किंवा सामाजिक कार्यकर्त्यांच्या पाठपुराव्यामुळेच शेतकऱ्यांपर्यंत पोहोचतो.

# अमरावतीत 15 वर्षीय मुलीची आत्महत्या, तरुणाला अटक

**महासागर प्रतिनिधी**
**अमरावती,( दि.26 )-** गाडगेनगर परिसरात एका 15 वर्षीय अल्पवयीन मुलीने गुरुवारी (ता. 24) राहत्या घरी गळफास घेऊन आत्महत्या केली. या घटनेमुळे परिसरात खळबळ उडाली आहे.



पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, मुलीच्या आईने दिलेल्या तक्रारीत नमूद केले आहे की अभिषेक उर्फ गोलू पवार (24, रा. रमाबाई आंबेडकरनगर) हा मुलीचा सतत पाठलाग करून तिला त्रास देत होता. वारंवार छेडछाड व मानसिक छळामुळे मुलगी प्रचंड तणावाखाली होती. या त्रासाला कंटाळून तिने आत्महत्येचा मार्ग स्वीकारला, असा आरोप तक्रारीत करण्यात आला आहे. घटनेची माहिती मिळताच गाडगेनगर पोलिसांनी घटनास्थळी धाव घेऊन पंचनामा केला. शवविच्छेदनासाठी मृतदेह जिल्हा रुग्णालयात पाठविण्यात आला. तक्रारीच्या आधारे पोलिसांनी अभिषेक पवार याला ताब्यात घेतले. चौकशीत आरोपीविरुद्ध आत्महत्येस प्रवृत्त करणे, अनुसूचित जाती-जमाती अत्याचार प्रतिबंधक कायदा (ॲट्रॉसिटी कायदा) आणि पोक्सो कायदा अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. आरोपीला शुक्रवारी न्यायालयात हजर केले असता न्यायालयाने त्याला एक दिवसाची पोलिस कोठडी सुनावली. पुढील तपास गाडगेनगर पोलिस ठाण्याचे पथक करीत आहे.या घटनेमुळे परिसरात हळहळ व्यक्त केली जात असून, अल्पवयीन मुलींवरील अत्याचाराच्या घटनांबाबत पालक व नागरिकांमध्ये संतापाचे वातावरण निर्माण झाले आहे. पोलिसांनी अशा प्रकारच्या घटनांवर कठोर कारवाई करण्याचे आश्वासन दिले आहे.

# बेल्ट लॉक झाल्यामुळं एसटी बसचा अपघात

## हरिसाल ते कोलकास मार्गावर लालपरीचा बेल्ट लॉक झाल्यामुळं झाला अपघात

### प्रवासी थोडक्यात बचावले

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती, (दि.26)**- धारणीवरून अमरावतीला जाणारी नवी कोरी लालपरी, म्हणजेच राज्य परिवहन महामंडळाची एसटी बस, हरिसाल ते कोलकास मार्गावर अपघातग्रस्त झाली. बसचा बेल्ट अचानक लॉक झाल्याने पुढील डावीकडील चाकही अडकले आणि बस घसरत जाऊन रस्त्यालगतच्या झाडावर आदळली. सुदैवाने या भीषण प्रसंगात सर्व प्रवासी, चालक व वाहक सुखरूप बचावले.

मिळालेल्या माहितीनुसार, अमरावतीवरून पहाटे सहा वाजता सुटलेली टपाल गाडी नावाची ही बस सकाळी अकरा वाजता धारणी येथे पोहोचली. त्यानंतर 11.30 वाजता ती पुन्हा अमरावतीकडे रवाना झाली. धारणीपासून सुमारे 30 किलोमीटर अंतरावर असलेल्या हरिसाल ते कोलकास दरम्यान हा अपघात घडला. बसचा बेल्ट लॉक झाल्याने वाहनाचे नियंत्रण सुटले आणि बस बराच पल्ला घासत गेली. चालकाने प्रसंगावधान दाखवत मोठा अपघात टाळला. बस रस्त्यालगत असलेल्या सागाच्या झाडावर आदळली, मात्र पलटली नाही. त्यावेळी बसमध्ये अंदाजे 10 ते 15 प्रवासी होते. अपघातानंतर प्रवाशांना कोणतीही दुखापत झाली नाही. काही वेळाने आलेल्या दुसऱ्या बसमधून सर्व प्रवासी आपापल्या गंतव्य स्थानाकडे रवाना झाले. घटनास्थळ घनदाट जंगल परिसर असल्याने येथे मोबाईल नेटवर्क उपलब्ध नव्हते. समोरून जाणाऱ्या एका बस चालकाने परतवाडा मार्गे अमरावतीला ही घटना कळवली. त्यानंतर अमरावती आगारातून अधिकारी घटनास्थळी पोहोचले आणि पंचनामा करण्यात आला. या घटनेनंतर स्थानिकांमध्ये चर्चेला उधाण आले असून, नवनवीन बसच्या तांत्रिक दोषांबाबत चौकशीची मागणी होत आहे. परिवहन विभागानेही घटनेची गंभीर दखल घेत तपास सुरू केला आहे.



नवीन एसटी बस चालवत असताना अचानक बेल्ट लॉक झाला आणि वाहनाचे नियंत्रण सुटले. बस झाडावर जाऊन आदळली. सुदैवाने सर्व प्रवासी सुरक्षित आहेत.

**प्रल्हाद खानदाते,**
**अपघातग्रस्त बसचे चालक**

# चिखलदरा ते घटांग मार्गावर कार घाटात कोसळली

## जिल्हा शोध व बचाव पथकाने सहा पर्यटकांचे प्राण वाचवले









**महासागर प्रतिनिधी**

**चिखलदरा, (दि.26)** - अमरावती जिल्ह्यातील चिखलदरा घाट रस्त्यावर भीषण अपघातात सहा पर्यटकांचा जीव धोक्यात आला होता. मात्र जिल्हा शोध व बचाव पथकाच्या (डीडीआरएफ) जवानांनी वेळीच धाडसी कारवाई करत सहाही जणांना सुरक्षित बाहेर काढून त्यांचे प्राण वाचवले.

चिखलदरा हे निसर्गरम्य पर्यटनस्थळ असल्याने येथे दररोज मोठ्या प्रमाणात पर्यटकांची गर्दी होत असते. पर्यटकांच्या सुरक्षेसाठी जिल्हाधिकारी, अमरावती आणि निवासी उपजिल्हाधिकारी यांच्या आदेशानुसार चिखलदरा पोलीस ठाण्याच्या मार्गदर्शनाखाली (डीडीआरएफ) पथक तैनात आहे. शनिवारी शहापूर येथून अर्धा किलोमीटर पुढे पर्यटकांची एक कार चालकाचे नियंत्रण सुटल्याने दरीत कोसळली. गाडीत चार प्रौढ व दोन मुले होती असे एकूण सहा जण होते. घटनेची माहिती मिळताच चिखलदरा तहसीलदार आणि ठाणेदार पोलीस स्टेशन चिखलदरा यांनी तत्काळ बचाव कार्य सुरू करण्याचे निर्देश दिले.

### धाडसी बचाव मोहीम

डीडीआरएफ अमरावतीच्या पथकाने अत्यंत धोकादायक परिस्थितीत बचाव कार्य केले. आपल्या जीवाची पर्वा न करता सर्व सहाही पर्यटकांना दरीतून सुखरूप बाहेर काढण्यात आले. जखमींना तात्काळ चिखलदरा येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात (पीएचसी) उपचारासाठी दाखल करण्यात आले. या मोहिमेदरम्यान पथकातील भूषण वैद्य व अर्जुन सुंदरडे यांना बचाव करताना पायाला दुखापत झाली असून त्यांच्यावर आरएच चिखलदरा येथे उपचार सुरू आहेत.

### पथकातील शूर जवानांचे कौतुक

बचाव कार्यात दाखविलेल्या धाडसाबद्दल डीडीआरएफ पथकाचे जिल्हाधिकारी, पोलीस विभाग व स्थानिक प्रशासन यांनी कौतुक केले आहे. तात्काळ प्रतिसाद व नि:स्वार्थ सेवेमुळे सहा पर्यटकांचे प्राण वाचले असून स्थानिक नागरिकांनीही पथकाच्या कार्याचे अभिनंदन केले. या घटनेनंतर पुन्हा एकदा स्पष्ट झाले की, डीडीआरएफ पथकाची तत्परता आणि धाडसी भूमिका अनेकांचे जीव वाचविण्यात महत्त्वपूर्ण ठरत आहे. या बचाव मोहिमेत देवानंद भुजाडे,विशाल निमकर, भूषण वैद्य, अर्जुन सुंदरडे, महेश मांदळे, सुरेश पालवे, सुरज ठाकूर, अजय आसोले या डीडीआरएफ च्या जवानांचा समावेश होता.

### महिलेची विहिरीत उडी घेऊन आत्महत्या

**अमरावती** - बडनेरा पोलिस ठाण्याच्या हद्दीतील अंजनगावबारी येथील महादेवपुरा भागातील रहिवासी भारती शंकर नरखेडकर (रा. महादेवपुरा) यांनी घराच्या मागील बाजूस असलेल्या विहिरीत उडी घेऊन आत्महत्या केली. या आत्महत्येचे कारण अद्याप समजू शकले नाही. त्यांच्या मुलगा शुभम शंकर नरखेडकर यांच्या दिलेल्या माहितीनुसार बडनेरा पोलिसांनी आकस्मिक मृत्यूची नोंद घेतली आहे.

# सीसीटीव्हीच्या आधारे मोटारसायकल चोरटे जेरबंद

## 24 हजारांची दुचाकी 24 तासात हस्तगत

**अमरावती, (दि. 26) :** सिटी कोतवालीच्या हद्दीत झालेल्या मोटारसायकल चोरीचा गुन्हा अवघ्या काही तासांत उघडकीस आणत पोलिसांनी दोन चोरट्यांना अटक केली आहे. त्यांच्याकडून चोरीस गेलेली हीरो होंडा स्प्लेंडर एनएक्सजी दुचाकी हस्तगत करण्यात आली असून, गुन्ह्याचा तपास गतीने करण्यात आला.

फिर्यादी सुरज संजय खंडारे (वय 24, व्यवसाय ङ्क डॉक्टर, रा. आसरा, ता. भातकुली) हे डॉ. पंकज इंगळे यांच्या वालकट कंपाऊंडमधील दवाखान्यात खाजगी नोकरी करतात. त्यांनी 24 जुलै रोजी रात्री 8 वाजता ड्युटीसाठी दवाखान्यात पोहोचून त्यांची एमएच 27 एडी 5809 या क्रमांकाची दुचाकी बाहेर रस्त्यावर उभी केली होती. मात्र रात्री 11 वाजता गेट बंद करण्यासाठी बाहेर आल्यानंतर त्यांना दुचाकी चोरीला गेल्याचे लक्षात आले. त्यांनी आसपास शोध घेतला, मात्र मोटारसायकल कुठेही न मिळाल्याने त्यांनी दुसऱ्या दिवशी कोतवाली पोलीस ठाण्यात तक्रार दिली. त्यांच्या तक्रारीवरून गुन्हा नोंदवून तपास सुरू करण्यात आला. गुन्ह्याचा तपास करताना पोलिसांनी घटनास्थळावरील सीसीटीव्ही फुटेजची तातडीने पाहणी केली. या फुटेजच्या आधारे संशयितांची ओळख पटवत पोलिसांनी अभिषेक आनंदीलाल साहू (वय 23, रा. साहूबाग, संतोषी नगर, अमरावती) आणि 2) योगेश चैतराम टेकाम (वय 23, रा. वॉर्ड क्र. 1, भटेरा चौकी, बालाघाट, मध्यप्रदेश) यांना ताब्यात घेतले. पोलिसांनी केलेल्या चौकशीत आरोपींनी गुन्ह्याची कबुली दिली असून, 20 हजार रुपये किंमतीची स्प्लेंडर दुचाकी पंचासमक्ष जप्त करण्यात आली. सदर यशस्वी कार्यवाही पोलीस आयुक्त अरविंद चावरिया, पोलीस उपायुक्त शाम घुगे तसेच सहायक पोलीस आयुक्त जयदत्त भवर यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली. या तपासात वरिष्ठ पोलीस निरीक्षक मनोहर कोटनाके, रामदास पालवे, पोलिस उपनिरीक्षक विजय गीते, पोलिस हवालदार घनश्याम यादव, दीपक श्रीवास, प्रदीप राठोड आणि मंगेश दिघेकर यांनी महत्त्वपूर्ण योगदान दिले.

# मंदिरातील दानपेटी फोडणारा आरोपी अटकेत!

## ग्रामीण गुन्हे शाखेची कारवाई; आणखी एका चोरीचा उलगडा

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती, (दि. 26)** कुऱ्हा पोलीस ठाणे हद्दीतील लहान देवी मंदिरातील दानपेटी फोडून झालेल्या चोरीप्रकरणी ग्रामीण गुन्हे शाखेच्या पथकाने एकाला कुऱ्हा बसस्थानक परिसरातून अटक केली आहे. कुणाल ऊर्फ आदेश अरुण पारडे (वय 30, रा. चांगापुर, अमरावती) असे आरोपीचे नाव आहे. आरोपीकडून चोरी केलेल्या पैशांपैकी 1 हजार 150 रुपयांची रोकड जप्त करण्यात आली आहे. अटकेतील आरोपीने चांदूर रेल्वे येथील अंबापुर मंदिरातील दानपेटी फोडण्याचा प्रयत्न केल्याचेही उघड झाले आहे.

कुऱ्हा येथील रहिवासी प्रदीपसिंह पचलोरे (वय 61) यांनी पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली होती की, लहान देवी मंदिरातील दानपेटीचे कुलूप तोडून अज्ञात व्यक्तीने 5 हजार 500 रुपये चोरी केले. यावरून कुऱ्हा पोलिसांनी गुन्हा दाखल करून तपास सुरू केला. तपासादरम्यान ग्रामीण गुन्हे शाखेला गोपनीय माहिती मिळाली की एक संशयित इसम कुऱ्हा बसस्थानक परिसरात फिरत आहे. पोलिसांनी तत्काळ कारवाई करून आरोपी कुणाल पारडे याला ताब्यात घेतले. चौकशीत त्याने लहान देवी मंदिरातील चोरीची कबुली दिली. त्याच्याकडून चोरी केलेल्या पैशांपैकी 1150 रुपयांची रोख जप्त करण्यात आली. पुढील चौकशीत त्याने चांदूर रेल्वे येथील अंबापुर मंदिरातही चोरीचा प्रयत्न केल्याचे मान्य केले. सदर कारवाई पोलीस अधीक्षक विशाल आनंद, अपर पोलीस अधीक्षक पंकज कुमावत, पोलिस निरीक्षक किरण वानखडे यांच्या मार्गदर्शनाखाली ही कारवाई करण्यात आली. या कारवाईत मो. तस्लीम, मूलबंद भांबुरकर, अमोल देशमुख, मंगेश लकडे, सचिन मसांगे, दिनेश कनोजीया तसेच वाहनचालक निलेश आवंडकर सहभागी होते.

# मामाच्या मुलाचा अल्पवयीन मुलीवर लैंगिक अत्याचार

## वरुड पोलीस स्टेशन परिसरातील घटना

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती, (दि. 26)** - वरुड पोलीस स्टेशन परिसरात मामाच्या घरी आलेल्या एका अल्पवयीन मुलीवर तिच्या मामाच्या मुलाने लैंगिक अत्याचार केला. त्यामुळे अल्पवयीन मुलगी गर्भवती राहिली. आईच्या तक्रारीवरून, वरुड पोलिसांनी 17 वर्षीय अल्पवयीन आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. पोलिस सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, पीडितेचे पालक फुगे विकण्याचे काम करतात. ते गावोगावी जाऊन फुगे विकतात. गेल्या एक वर्षापासून पीडिता आणि तिचे पालक त्यांच्या मामासोबत त्यांच्या घरी राहत होते आणि फुगे विकण्याचे काम करत होते. दरम्यान, पीडिता आणि तिच्या मामाच्या मुलाचे प्रेमसंबंध होते. पीडितेचे पालक फुगे विकण्यासाठी बाहेर जात असताना मामाचा मुलगा घरी येत असे आणि तिच्याशी शारीरिक संबंध ठेवण्याचा प्रयत्न करत असे. काही दिवसांनी पीडितेला पोटदुखीचा त्रास होऊ लागला आणि तिची आई तिला उपचारासाठी रुग्णालयात घेऊन गेली. जिथे ती गर्भवती असल्याचे उघड झाले. त्यानंतर 25 जुलै रोजी पीडितेच्या आईने वरुड पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली. पोलिसांनी 17 वर्षीय अल्पवयीन मुलाविरुद्ध क्रूरतेचा गुन्हा दाखल करून तपास सुरू केला आहे.



# बडनेऱ्यात ऑनलाईन चक्री जुगार अड्ड्यावर पोलिसांचा छापा

## 11 जणांवर गुन्हा दाखल, 1.28 लाखांचा मुद्देमाल जप्त

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती, (दि. 26)** बडनेरा पोलिस ठाणे हद्दीतील नवीन वस्ती येथील छत्री चौकात सुरु असलेल्या ऑनलाईन चक्री जुगार अड्ड्यावर बडनेरा पोलिसांनी धाड टाकून मोठी कारवाई केली. या कारवाईतून पोलिसांनी टीव्ही, कीबोर्ड, माऊस, गेम बॉक्स, सात मोबाईल आणि रोख रक्कम मिळून एकूण 1 लाख 28 हजार 650 रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. ही कारवाई 25 जुलै रोजी दुपारी 3.30 वाजता करण्यात आली. बडनेरा पोलीस निरीक्षक सुमेध सोनोने यांच्या फिर्यादीवरून 11 जणांविरुद्ध जुगार प्रतिबंधक कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिसांना मिळालेल्या गोपनीय माहितीवरून ही कारवाई करण्यात आली. पोलिसांनी छापा टाकताच या ठिकाणी जुगार खेळताना 11 युवकांना रंगेहात पकडले. यावेळी पोलिसांनी टीव्ही, कीबोर्ड, माऊस, गेम बॉक्स. पेन, कॅल्क्युलेटर, फोन पे स्कॅनर, 7 मोबाईल फोन, 22595 रुपयांची रोख रक्कम असा एकूण 1 लाख 28 हजार 650 रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. आरोपींमध्ये कार्तिक पातालवंशी, अश्विन सोळंकी, तुषार पांडे, नवीन यादव, अक्षय कुरळकर, शेख फईम शेख कलीम, रितेश बोबडे, चेतन गायगोले, सौरभ निशानदार, उमेश मेश्राम, सुनील चव्हाण यांचा समावेश आहे. पोलिस अधिक तपास करीत आहेत.





# जिल्ह्यात 24 तासांपासून संततधार पाऊस

- मेळघाटात नद्या-नाले दुथडी भरून
- अनेक मार्गावरिल वाहतूक विस्कळीत

### पिकांना संजीवनी



**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती/ धारणी, (दि.26)**-अमरावती जिल्ह्यात गेल्या 24 तासांपासून संततधार पाऊस सुरु आहे. ज्यामूळे पिकांना संजीवनी मिळाली आहे. धारणी तालुक्यात गेल्या 24 तासांपासून कोसळणाऱ्या मुसळधार पावसामुळे अनेक वर्षांनंतर 'श्रावण महिन्याच्या झडीची' आठवण जागी झाली आहे. सतत सुरू असलेल्या या पावसाने तालुक्यातील परिसराला हिरवाईने व्यापले असून शेतकऱ्यांच्या चेहऱ्यावर आनंद फुलला आहे.

ज्येष्ठ नागरिकांच्या मते, पूर्वी श्रावण महिन्यात सातत्याने पाऊस पडत असे. स्थानिक भाषेत या सततच्या पावसाला 'श्रावणाची झड' असे संबोधले जायचे. जंगलतोड, प्रदूषण आणि नैसर्गिक संतुलन बिघडल्याने गेल्या काही वर्षांत असे दृश्य विरळ झाले होते. गेल्या आठवडाभरापासून कोरडे वातावरण असल्याने पिके सुकू लागली होती. मात्र, तीन दिवसांपासून कोसळणाऱ्या सततच्या पावसामुळे पिके पुन्हा लहरू लागली आहेत. त्यामुळे शेतकऱ्यांच्या चेहऱ्यावर पुन्हा हास्य उमटले आहे.



### कोल्हूरपूर येथे झाड कोसळले

अनेक दिवस कोरड्या असलेल्या डवाल मधुवा, सीपना आणि गडगा नद्या आता दुथडी भरून वाहत आहेत. गावांमधील लहान नाले देखील पाण्याने फुगून वाहत आहेत, ज्यामुळे परिसरात निसर्गसौंदर्य खुलून दिसत आहे. पावसामुळे काही ठिकाणी अडथळेही निर्माण झाले. धारणी-परतवाडा मुख्य रस्त्यावर कोल्हूपूरजवळ मोठे झाड पडल्याने काही तास वाहतूक ठप्प झाली. स्थानिक ग्रामस्थांच्या मदतीने झाड हटवून रस्ता पुन्हा सुरू करण्यात आला. काही ठिकाणी नद्यांचा पूर पुलावरुन वाहत असल्याने वाहतूक काही तासांकरिता खोळंबली होती.

# जड वाहनांसाठी बंदी, एसटी बस चालकांसाठी डोकेदुखी

## राजकमल उड्डाण पूल पुन्हा सुरु होणार की, नाही







**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती,(दि.26)** - शहरातील महत्त्वाचा वाहतुकीचा मार्ग असलेला राजकमल उड्डाण पूल 15 दिवसांसाठी बंद करण्यात आला आहे. 23 जुलै रोजी पुलाखालच्या भागात गंभीर भेगा व पॉपलॅड पडल्याचे निदर्शनास आल्यानंतर प्रशासनाने हा निर्णय घेतला. खबरदारीचा उपाय म्हणून जड वाहनांची वाहतूक तातडीने थांबवण्यात आली असून, केवळ हलकी वाहनेच पुलावरून जात आहेत.

या निर्णयामुळे शहरातील वाहतूक व्यवस्थेवर मोठा ताण आला आहे. एसटी बस आणि मालवाहतूक वाहनांना पर्यायी मार्गाने वळवावे लागत आहे. मात्र, सर्वच वाहनचालकांना याची पूर्ण माहिती नसल्याने बॅरिकेडपर्यंत आल्यावर त्यांना मार्ग बदलावा लागत आहे. वळविण्याची पुरेशी जागा नसल्याने विशेषत: बसचालकांना अडचणींचा सामना करावा लागत आहे.

### चारही बाजुंनी बॅरिकेडिंग

जड वाहनं वळविण्याच्या त्रासामुळे आणि छोटी वाहनं मोठ्या प्रमाणावर जमा झाल्याने शहरात वाहतूक कोंडी वाढली आहे. त्यामुळे नागरिकांना ऑफिस, शाळा आणि इतर कामांसाठी वेळेत पोहोचणे कठीण झाले आहे. जयस्तंभ, रुक्मिणीनगर, रेल्वे स्टेशन चौक या परिसरात कोंडी अधिक जाणवत आहे. पुलात भेगा पडल्याचे लक्षात येताच प्रशासनाने पोलिसांच्या मदतीने पुलाच्या चारही मार्गावर बॅरिकेडिंग केली आणि जड वाहनांना बंदी घातली. दुरुस्तीचे काम तातडीने सुरू केले असून पुढील 15 दिवस पूल बंदच राहणार असल्याची माहिती प्रशासनाने दिली आहे.

### शहरातील मुख्य वाहतूक खोळंबली

नागरिकांच्या सुरक्षेला प्राधान्य देत पूल दुरुस्तीचे काम युद्धपातळीवर सुरू आहे. शक्य तितक्या लवकर समस्या दूर करून पूल सुरू करण्याचे प्रयत्न सुरू आहेत, असे संबंधित अधिकाऱ्यांनी स्पष्ट केले. राजकमल उड्डाण पूल हा शहरातील मुख्य वाहतुकीचा कणा आहे. दररोज हजारो वाहनांची वर्दळ असलेल्या या पुलाची दुरुस्ती वेळेत पूर्ण झाल्यास वाहनचालकांना दिलासा मिळणार आहे. सध्या मात्र कोंडी, विलंब आणि अडचणींमुळे नागरिक त्रस्त झाले आहेत.

आरएनआय ४६९७५/१९८५ महासागर अमरावती

मालक, मुद्रक, प्रकाशक श्रीकृष्ण तनसुखदास चांडक यांनी अरूणोदय प्रेस, कॉटन मार्केट, नागपूर १८ येथे छापून दैनिक महासागर कार्यालय, होटल टूरिस्टच्या बाजूला रेल्वे स्टेशन चौक, अमरावती येथे प्रकाशित केले. संपादक -श्रीकृष्ण तनसुखदास चांडक (पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांच्यावर राहील) अमरावती मुख्य कार्यालय, पत्ता. दैनिक महासागर, होटल टूरिस्टच्या बाजूला रेल्वे स्टेशन चौक अमरावती, फोन नं. ९५१८९३४५०४

# शिंदीत जनावरांना लंपीची लागण,गोधन संकटात

**महासागर प्रतिनिधी**
**पथ्रोट, (दि. 26) :** अचलपूर तालुक्यातील शिंदी-पोही येथे शेतकऱ्याच्या गोधनाला लंपी आजाराची लागण झाली आहे. यामुळे गोधन संकटात आले आहे.



शिंदी बु.येथील शेतकरी राधेश्याम गावंडे या शेतकऱ्याच्या गाईला तर सचिन हिरपूरक, गोपाल लहाने, नितीन मालधुरे व प्रदीप वाठ यांच्याही जनावराला लंपी आजाराची लागण झाल्याने लंपी आजाराच्या भीतीने गावातील दुग्ध व्यवसायिक चिंता व्यक्त करीत आहेत. शेतकरी हे शेतीला जोड व्यवसाय म्हणून दुग्ध व्यवसाय करून कुटुंबीयांचा उदरनिर्वाह करत आहेत. गाय, बैल, वासरू यासारख्या जनावरांना विषारी माशा अथवा डासांनी चावा घेतल्यास जनावरांच्या अंगावर गाठी तयार होतात, या गाठी मोठ्या होऊन फुटतात व जनावरांच्या अंगावर जखमा तयार होतात. यातूनच ताप येऊन जनावरे मृत पावतात.

दरम्यान या आजाराला रोखण्यासाठी पशु संवर्धन विभागाने लसीकरण मोहीम त्वरित हाती घ्यावी अशी मागणी पशुपालकातून होत आहे. यापूर्वी येथे 2023 ला लंपीची लागण होऊन जवळपास 6 जनावरे मृत पावली होती. मागील वर्षीही या आजाराची जनावरांना लागण झाली होती. मात्र हा आजार लसीकरणातून नियंत्रणात आणण्यात आला होता.

उपाय योजना सुरू असून दरम्यान यावर्षी शिंदी येथील शेतकऱ्याच्या गोधनाला लंपीची झालेली लागण पाहता, पुन्हा या आजाराने डोके वर काढले असून त्यावर उपाययोजना सुरू आहे.मे महिन्यात गावात लंम्पि लसीकरण रबविले होते,या आजारावर त्वरित अंकुश लावण्याचा प्रयत्न करू. ज्या जनावरांना लंम्पि आजार झाला आहे त्या जनावराला इतर जनावराजवळ बांधू नये आणि गोठा स्वच्छ ठेवावा परिसरात जंतू नाशक फवारणी करावी.

**डॉ. रोशन .वेरूळकर ,**
**प्रभारी पशुवैद्यकीय अधिकारी शिंदी बु.**

माझ्या घराच्या गायीच्या बछड्याला ही लंम्पि आजाराची लागण झाली आहे मी दवाखाण्यात गेलो पण म्हणावी तशा उपचार जनावरांवर होत नाही परिणामी गावातील अनेक गोधन संकटात आहे अशात प्रभारी पशु वैद्यकीय अधिकारी आहे ते हप्यातून दोन दिवस असतात यामुळे येथे पूर्ण वेळ डॉक्टर हवेत यावर वरिष्ठनी लक्ष द्यावे व गावात लंम्पि आजार रोखणायाकरिता घरोघरी उपाय योजना करावी.

**सचिन हिरपूरकर,**
**पशुपालक शिंदी बु.**

# श्रीमती रामप्यारीबाई चांडक विद्यालयात 'सक्षम' कार्यक्रमाचा शुभारंभ

## विद्यार्थ्यांमध्ये उद्यमशीलता आणि स्वयंपूर्णतेचा संस्कार

**महासागर प्रतिनिधी**
**वरुड,( दि.26 )** - विद्यार्थ्यांमध्ये उद्यमशील मानसिकता आणि व्यावसायिक कौशल्ये विकसित करण्यासाठी उद्यम लर्निंग फाउंडेशन द्वारे राबविण्यात येणाऱ्या 'सक्षम' कार्यक्रमाचा शुभारंभ श्रीमती रामप्यारीबाई चांडक विद्यालय, लोणी येथे करण्यात आला.



या उपक्रमाअंतर्गत दोन दिवसीय प्रशिक्षण शिबिर वसंतराव हायस्कूल, जरूड येथे पार पडले. प्रशिक्षणानंतर इयत्ता नववीच्या विद्यार्थ्यांसोबत 'शिका आणि कमवा' या संकल्पनेवर आधारित उद्यमशीलतेचा पाया मजबूत करण्याचे काम सुरू झाले.प्रभारी शिक्षक प्रवीण चौधरी यांनी विद्यार्थ्यांना कार्यक्रमाची संकल्पना, उद्दिष्टे, कृतीपत्रिकांचा अभ्यास, प्रकल्प नियोजन आणि अंमलबजावणी याबाबत मार्गदर्शन केले. त्यांनी सांगितले की हा कार्यक्रम जानेवारी 2026 पर्यंत राबविण्यात येणार असून, विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी हा उपक्रम अत्यंत उपयुक्त ठरणार आहे. कार्यक्रमाच्या प्रारंभी मुख्याध्यापक एस. व्ही. खोडे, पर्यवेक्षक व्ही. एच. चिमोटे आणि सर्व शिक्षक वृंद यांच्या उपस्थितीत विद्यार्थ्यांना प्रोत्साहित करण्यात आले. विद्यार्थ्यांनी या अभिनव उपक्रमाचे मनापासून स्वागत करत पूर्ण सहभागाची ग्वाही दिली.


### 'सक्षम' कार्यक्रमाची उद्दीष्ट

विद्यार्थ्यांमधील सुप्त कलागुणांचा शोध, उपलब्ध संसाधनांचा वापर करून न्यूनतम खर्चात प्रकल्पनिर्मिती, सृजनशील विचारांची जोपासना, व्यक्तिमत्त्व विकास आणि संवाद कौशल्य वृद्धिंगत करणे, कृतीपत्रिकांचा अभ्यास आणि प्रत्यक्ष अंमलबजावणी करणे हे या कार्यक्रमाचे उद्दीष्ट होते.'सक्षम' कार्यक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये उद्यमशीलतेचा संस्कार आणि स्वयंपूर्णतेची भावना रुजणार असल्याचे आयोजकांनी सांगितले.

# प्राथमिक शिक्षकांना केंद्रप्रमुख पदापासून वंचित

**शासनाच्या निर्णयाविरोधात असंतोष**

**महासागर प्रतिनिधी**
**अमरावती,( दि.26 )**- महाराष्ट्र शासनाच्या ग्रामविकास विभागाने 18 जुलै 2025 रोजी काढलेल्या अधिसूचनेमुळे जिल्हा परिषद शाळांमधील अनेक ज्येष्ठ शिक्षकांना पदोन्नतीपासून वंचित राहावे लागणार आहे. या अधिसूचनेनुसार केंद्रप्रमुख या नव्याने तयार केलेल्या पदासाठी केवळ प्रशिक्षित पदवीधर शिक्षक (प्राथमिक) या पदावर किमान सहा वर्षे कार्यरत असणे आवश्यक आहे.



मात्र अनेक बीएडधारक आणि 20 वर्षांहून अधिक सेवायोग्य अनुभव असलेले शिक्षक केवळ %पदनाम% प्राथमिक शिक्षक असल्यामुळे या पदासाठी अपात्र ठरत आहेत. सेवाज्येष्ठता, गुणवत्ता आणि अनुभव गौण ठरवून फक्त पदनामाच्या तांत्रिक अटीवरून शिक्षकांना वगळण्यात येत असल्याचा आरोप शिक्षक संघटनांनी केला आहे. राज्यातील अनेक जि.प. शाळांमध्ये बीएडधारक शिक्षक दीर्घकाळापासून कार्यरत आहेत. परंतु त्यांची नोंद टीजीटी (प्रशिक्षित पदवीधर शिक्षक) म्हणून झालेली नसल्यामुळे त्यांना या पदोन्नतीतून वगळले जात आहे. शिक्षक संघटनांच्या मते हा निर्णय अन्यायकारक असून, शासनाने अटी शिथिल करून सर्व सेवाज्येष्ठ शिक्षकांना समान संधी द्यावी. शिक्षकांनी स्पष्ट केले की, 22 वर्षांची सेवा व बीएड पदवी असूनही केवळ पदनाम नसल्याने पदोन्नतीपासून वंचित ठेवणे हा सरळ अन्याय आहे. या निर्णयाविरोधात विविध शिक्षक संघटनांनी उच्च न्यायालयात याचिका दाखल करण्याचा विचार सुरू केला आहे. संघटनांची मागणी आहे की, शिक्षकांचा अनुभव व सेवाज्येष्ठतेचा योग्य सन्मान करून त्यांना केंद्रप्रमुख पदासाठी पात्रतेत सामावून घ्यावे. शासनाने या संदर्भात लवकरात लवकर सकारात्मक निर्णय घेण्याची अपेक्षा शिक्षकांकडून व्यक्त केली जात आहे.

## जखमी परिचारिकेचा उपचारादरम्यान मृत्यू

**अमरावती** - नांदगावपेठ येथील दातपाडी नदी पुलाजवळ राष्ट्रीय महामार्गावर 19 जुलै रोजी झालेल्या अपघातात गंभीर जखमी झालेल्या परिचारिकेचा उपचारादरम्यान मृत्यू झाला. पोलिस सुत्रानुसार, दिनेश चंडाले यांच्या दुचाकीला अज्ञात मिनी ट्रकने जोरदार धडक दिली होती. या अपघातात दिनेश आणि त्यांच्यासोबत प्रवास करणारी त्यांची परिचित मयुरी गंभीर जखमी झाली होती. तिला तातडीने खासगी रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. मात्र, उपचारादरम्यान 23 जुलै रोजी तिचा मृत्यू झाला. या प्रकरणी नांदगावपेठ पोलिसांनी 24 जूलै रोजी अज्ञात ट्रक चालकाविरोधात गुन्हा दाखल केला आहे.

# अंजनगाव येथे मुख्याध्यापकांची सहविचार सभा यशस्वी

## शिक्षणातील गुणवत्ता सुधारण्यासाठी योजनांची सविस्तर चर्चा

**महासागर प्रतिनिधी**
**अंजनगाव सुर्जी,( दि.26 )** - स्थानिक अंजनगाव सूर्जी येथे शिक्षणाधिकारी माध्यमिक अमरावती, अंजनगाव-दर्यापूर तालुका मुख्याध्यापक संघ आणि डायट अमरावती यांच्या संयुक्त विद्यमाने सीताबाई संगई बॉईज हायस्कूल येथे नुकतीच दोन्ही तालुक्यातील माध्यमिक मुख्याध्यापकांची सहविचार सभा यशस्वीरित्या संपन्न झाली.



या सभेला अमरावती शिक्षणाधिकारी कार्यालयाचे उपशिक्षणाधिकारी निखिल मानकर प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. प्रमुख अतिथी म्हणून गटशिक्षणाधिकारी सुधीर खोडे, योजना अधिकारी सुनील वरकडे, डायट तज्ञ दीपक चांदूरे, परिवहन निरीक्षक राहूल सरकटे, श्रुतिका गोपीवार आणि स्काऊट गाईड जिल्हा संघटक आठवले उपस्थित होते. या प्रसंगी निखिल मानकर, सुधीर खोडे व दीपक चांदूरे यांचा मुख्याध्यापक संघातर्फे सत्कार करण्यात आला. यावेळी मंचावर अंजनगाव तालुका मुख्याध्यापक संघाचे अध्यक्ष केतन खिरकर, दर्यापूर मुख्याध्यापक संघाचे अध्यक्ष केशव भडांगे, सीताबाई संगई विद्यालयाचे प्राचार्य उत्तम मुरकुटे आणि राकेश डोणगावकर उपस्थित होते. सभेचे सुत्रसंचलन सुनील लव्हाळे यांनी केले तर आभार प्रदर्शन दिलीप नवरे यांनी मानले. या सहविचार सभेमुळे मुख्याध्यापकांना शैक्षणिक धोरणांबाबत नव्या कल्पना आणि मार्गदर्शन मिळाले, ज्याचा थेट फायदा विद्यार्थ्यांना होणार आहे.

### महत्त्वपूर्ण मार्गदर्शन आणि योजनांची माहिती

सभेत उपशिक्षणाधिकारी निखिल मानकर यांनी शिक्षण विभागाच्या विविध योजनांबाबत सविस्तर माहिती दिली. ज्यामध्ये शासनाची 'एक पेड माँ के नाम' मोहीम, इको क्लब मिशन, विविध शिष्यवृत्ती योजना, स्कॉफ, यु-डायस, सरल प्रणाली, निपुण भारत अभियान, विद्यार्थी सुरक्षा, तक्रार पेटी व सीसीटीव्ही कॅमेरे यांची आवश्यकता, स्काऊट गाईड चळवळविषयी सांगितले. याशिवाय शाळेतील भौतिक सुविधांचा विकास, विद्यार्थ्यांमध्ये गुणवत्ता वृद्धी आणि नव्या तंत्रज्ञानाचा वापर या विषयांवरही मार्गदर्शन करण्यात आले. डायट तज्ञ दीपक चांदूरे व इतर मान्यवरांनी त्यांच्या अनुभवांचे आदानप्रदान करून उपस्थितांना नवीन शैक्षणिक संकल्पना समजावून सांगितल्या. मुख्याध्यापकांनी विविध शंका उपस्थित केल्या आणि तज्ञांनी त्या निरसन केल्या.

# अंबाडा येथे कायदेविषयक शिबिर

**विद्यार्थ्यांमध्ये कायदे साक्षरतेचा संदेश**

**महासागर प्रतिनिधी**
**मोर्शी, ( दि.26 )**- तालुका विधी सेवा समिती मोर्शी व मोर्शी वकील संघ यांच्या संयुक्त विद्यमाने 26 जुलै रोजी ग्रामविकास विद्यालय अंबाडा येथे कायदेविषयक मार्गदर्शन शिबिराचे आयोजन करण्यात आले. विद्यार्थ्यांमध्ये कायदेविषयक साक्षरता निर्माण होऊन हक्क व अधिकारांची माहिती मिळावी हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश होता.



ग्रामविकास शिक्षण संस्था अंबाडा चे प्रशासक तथा दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर मोर्शी एन. के. खराडे यांच्या अध्यक्षतेत कार्यक्रम पार पडला. प्रमुख अतिथी म्हणून पोलीस निरीक्षक सुरज बोंडे व मोर्शी तालुका वकील संघाचे सचिव ॲड.. पंकज तडस उपस्थित होते. प्रमुख वक्ते म्हणून वरिष्ठ विधीज्ञ ॲड. मंगेश केकरे यांनी महिलांच्या संरक्षणासाठी असलेल्या विविध कायद्यांची माहिती विद्यार्थ्यांना दिली. तसेच ॲड. विजय घोडके, ॲड. अमोल दाणे, ॲड. स्वप्निल ढोले, ॲड. स्वराज श्रीराव, ॲड. संतोष बिजवे, ॲड. अंकिता श्रीराव यांनीही कायदेविषयक मुद्दे मांडले. शिबिरादरम्यान 9 वीच्या मुलींनी 'नारीशक्ती' या विषयावर प्रभावी पथनाट्य सादर करून महिलांच्या हक्कांविषयी जनजागृती केली. कार्यक्रमाचे संचालन हर्षल आमले यांनी केले, तर आभार प्रदर्शन वैशाली खोब्रागडे यांनी केले. विद्यालयातील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या सहकार्यामुळे शिबिर यशस्वीरीत्या संपन्न झाले. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये कायदेविषयक जागरूकता निर्माण झाली असून, महिलांच्या हक्क व संरक्षणाबाबत महत्त्वपूर्ण संदेश पोहोचविण्यात आला.

# श्री समर्थ लहानुजी महाराज पुण्यतिथी महोत्सव 2 ऑगस्टला

## श्रीक्षेत्र टाकरखेडा येथे भक्तांचा मोठा मेळावा

**महासागर प्रतिनिधी**
**तिवसा,( दि.26 )**- तिवसा तालुक्यातील श्रीक्षेत्र टाकरखेडा येथे संत परंपरेचे तेजस्वी दीप असलेल्या श्री समर्थ परमहंस लहानुजी महाराज यांचा पुण्यतिथी महोत्सव 2 ते 9 ऑगस्ट दरम्यान मोठ्या भक्तीभावाने आणि धार्मिक उत्साहात साजरा होणार आहे. दरवर्षीप्रमाणे यावर्षीही या सोहळ्याची जय्यत तयारी सुरू झाली असून, संपूर्ण परिसर भक्तिमय वातावरणाने उजळून निघाला आहे.

आठवडाभर चालणाऱ्या या महोत्सवात तीर्थ स्थापना, महाप्रसाद, सामूहिक प्रार्थना, मोहन साधना, सामूहिक ध्यान, रामधुन, ग्रामफेरी, समाधी व मूर्ती अभिषेक पूजन, तसेच श्री लीलामृत ग्रंथाचे सामूहिक पारायण आणि पंचपदी हरिपाठ यासारखे धार्मिक कार्यक्रम होणार आहेत. याशिवाय काल्याचे कीर्तन, संगीत-अभंग वाणी, महाआरती, श्रद्धांजली गीत आणि विविध सामाजिक उपक्रम या महोत्सवाची शोभा वाढवतील. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी श्री समर्थ लहानुजी महाराज प्रार्थना सेवा मंडळ, वारकरी सेवा मंडळ, तसेच लहानुजी नवदुर्गा मंडळ, बाल दुर्गा मंडळ आणि महिला बचत गट अत्यंत दक्षतेने काम पाहत आहेत. दरवर्षीप्रमाणे यावर्षीही सर्व व्यवस्था चोख ठेवली जाणार असल्याचे आयोजकांनी सांगितले.

या भव्य धार्मिक सोहळ्यासाठी अनेक मान्यवर उपस्थित राहणार आहेत. त्यामध्ये वर्धा जिल्ह्याचे पालकमंत्री पंकज भोयर, खासदार अमर काळे, आमदार दादाराव केचे, आमदार सुमित वानखडे, आमदार राजेश वानखडे, माजी आमदार ॲड. यशोमती ठाकूर, पुष्पाताई बोंडे, लक्ष्मणराव गमे, जनार्दन पंत बोथे, कृष्णा गिरधर, अभिजीत बोके, विलास साबळे आदींचा समावेश आहे. संतांचा मार्ग हा भक्तीचा दीप असल्याचे सांगत आयोजक मंडळाने सर्व भाविकांना या पुण्यतिथी महोत्सवाचा लाभ घेण्याचे आवाहन केले आहे. टाकरखेडा हे भक्तीचे पवित्र स्थान असून, संतांचा प्रकाश येथे सदैव उजळतो, असे आयोजकांनी नमूद केले.

# टेंभुरखेडा ग्रामपंचायतीची शिस्तबद्ध कचरा व्यवस्थापन मोहीम

## सर्व कचरा गाड्या कार्यरत, मटेरियल उचलले



**महासागर प्रतिनिधी**
**वरुड,( दि.26 )** - तालुक्यातील टेंभुरखेडा ग्रामपंचायतीने स्वच्छता अभियान आणि घनकचरा व्यवस्थापन क्षेत्रात आदर्श निर्माण केला आहे. सध्या ग्रामपंचायतीच्या ताब्यातील सर्व तीन कचरा गाड्या पूर्ण क्षमतेने कार्यरत आहेत. गावातील घराघरातून नियमितपणे कचरा संकलन केले जात असून, स्वच्छतेबाबत कोणतीही तडजोड केली जात नाही.



काही दिवसांपूर्वी स्थानिक पातळीवर कचरा गाड्या बंद आहेत किंवा इतरत्र वापरल्या जातात, अशा शंका आणि अफवा पसरवल्या जात होत्या. मात्र, ग्रामपंचायतीने प्रत्यक्ष कामगिरीद्वारे या सर्व अपप्रचारांना खोडून काढले आहे. सर्व गाड्यांची देखभाल-दुरुस्ती पूर्ण झाल्याने त्या व्यवस्थित कार्यरत आहेत. कचरा व्यवस्थापनासोबतच, ग्रामपंचायतीने विविध विकासकामांसाठी वापरलेले बांधकाम साहित्य (मटेरियल) देखील नियमानुसार उचलले आहे. रस्ते डांबरीकरण, नाली बांधकाम, पाणीपुरवठा पाइपलाइन अशा अनेक प्रकल्पांमध्ये वापरलेले साहित्य कुठेही टाकून ठेवलेले नाही.




गावकऱ्यांच्या सक्रिय सहभागामुळे आणि ग्रामपंचायतीच्या पारदर्शक कार्यपद्धतीमुळे ही कामे यशस्वी झाली. गावकऱ्यांनी ग्रामपंचायतीच्या या जबाबदार दृष्टिकोनाचे कौतुक केले आहे. गावाच्या स्वच्छतेत सातत्य ठेवण्यासाठी ग्रामपंचायत कटिबद्ध आहे. गावकऱ्यांच्या सहकार्याने आगामी काळात आणखी विकासकामे राबविली जातील, असे सरपंच रोशनी निंभोरकर यांनी सांगितले.

# मोर्शी पोलिसांची जुगार अड्ड्यावर धाड

**पिंपळखुटा ( मोठा ) मध्ये कारवाई**

**महासागर प्रतिनिधी**
**मोर्शी, ( दि.26 )**- तालुक्यातील पिंपळखुटा (मोठा) येथील 70 गाव पाणीपुरवठा योजनेच्या जलशुद्धीकरण केंद्राच्या मागे सुरु असलेल्या जुगारावर मोर्शी पोलिसांनी कारवाई केली. 24 जुलै रोजी स्कॉड विभागाच्या पथकाने सापळा रचून त्या ठिकाणी छापा टाकला. धाडीत शेख शाकीर शेख वजीर (43), अनिस शेख युनूस (28), सतीश प्रभाकर राणे (43), योगेश चंद्रकांत चरडे (30) या चार आरोपींना रंगेहात अटक करण्यात आली. नव्याने रुजू झालेले ठाणेदार सुरज बोंडे यांच्या मार्गदर्शनाखाली ही धडक मोहीम राबविण्यात आली.

**10.61 लाखांचा मुद्देमाल जप्त!**



जुगार खेळणाऱ्यांच्या ताब्यातून 4,550 रुपये नगदी, 250 रुपयांचे ताशपत्ते व फारी, 67 हजाराचे चार अँड्रॉइड मोबाईल, 9,50,000 किमतींची महिंद्रा फोर व्हीलर (एमएच 27/एआर 1162) असा एकूण 10,61,700 रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. काही आरोपी घटनास्थळावरून पळून गेले असून पोलिस त्यांचा शोध घेत आहेत. यापूर्वीही मोर्शी पोलिसांनी हद्दीतील अवैध वरली मटका धंद्यावर धाड टाकून दोन आरोपींविरुद्ध गुन्हे दाखल केले होते. ही कारवाई पोलिस अधीक्षक विशाल आनंद (अमरावती ग्रामीण), अप्पर पोलीस अधीक्षक पंकज कुमावत, पोलीस उपविभागीय अधिकारी संतोष खांडेकर यांच्या मार्गदर्शनात, तसेच पोलीस निरीक्षक सुरज बोंडे यांच्या नेतृत्वाखाली करण्यात आली. यामध्ये पो.उपनिरीक्षक आकाश शिवणकर, तुषार चव्हाण, अंमलदार छत्रपती करपते आणि स्वप्निल बायस्कर यांनी सहभाग घेतला. पोलिस ठाणेदार सुरज बोंडे यांनी आगामी पोळा, गणेशोत्सव, दसरा, दिवाळी या सणांच्या पार्श्वभूमीवर अवैध धंदे थांबवण्यासाठी कडक पावले उचलली आहेत. त्यामुळे जुगार, मटका व दारू विक्रेत्यांचे धाबे दणाणले आहेत.

